# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.११/०६/२०१९
## दि.१०/०६/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे १८६/१९,भादविक ३०७,३०९,३२३,५०४,महा.पो.का.क.३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | मंगल म्हेत्रे, वय ३२ वर्षे,रा.बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपी** | कुंडलीक पांडुरंग गाडेकर, वय ५० वर्षे,रा. श्रेयशनगर, गल्ली नं.९, अपर इंदिरानगर, बिबवेवाडी,पुणे (ससुन हॉस्पिटल येथे ॲडमीट आहे.) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०६/२०१९ रोजी रात्रौ ०३/०० वा.चे सुमारास श्रेयशनगर, गल्ली नं.९, अपर इंदिरानगर,बिबवेवाडी,पुणे |
| **तपशिल** | यातील जखमी महिला सौ.चित्रा कुंडलीक गाडेकर, वय ४० वर्षे,रा.सदर ही फिर्यादी यांची बहिण असुन, यातील नमुद इसम कुंडलीक गाडेकर हा फिर्यादी यांचा मेव्हूना आहे. कुंडलीक गाडेकर याने सुमारे ४ ते ५ महिन्यापासुन फिर्यादी यांचे बहिणीचे चारित्र्यावर संशय घेवुन तिला वेळोवेळी शिवीगाळ व मारहाण करुन त्रास देत असे. वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, फिर्यादी यांची बहिण चित्रा गाडेकर,ही तिचे राहते घरी झोपली असताना, तिचे पती कुंडलीक गाडेकर यांनी तीचे चारित्र्यावर संशय घेवून तिला जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने धारदार चाकुने तीचे पोटावर, डाव्या बरगडीवर, डाव्या छातीवर, पायाचे मांडीवर व गुडघ्यावर वार करुन, तिला शिवीगाळ करुन, मारहाण करुन, गंभीर जखमी करुन, तिला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला व तिचे पतीने कसलेतरी किटक नाशक औषध स्वतः पिवुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | व.पो.निरी. मुरलीधर करपे ९८७०२९८८७० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे २९४/१९,भादविक ३८१ |
| **फिर्यादी** | प्रसाद उनवने,वय-४४ वर्षे,रा.धनकवडी पुणे |
| **आरोपी** | अतुल पांडुरंगजी बुरुडकर,रा.स्टार पॉईट कॉन्व्हेंटजवळ,प्लॉट नं.७५/ए, गाडगे बाबा नगर, रामन्ना मारुती रोड, हनुमानगर, नागपूर, (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०५/२०१९ रोजी दुपारी ०२/०० वा.ते दि.०६/०६/२०१९ रोजी ११/०० वा.चे दरम्यान आय.ए.एस.एस.ऑफिस प्रभात प्रिंटींग प्रेसच्या वर, मुकुंदनगर पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी यांनी आय.ए.एस.एस.ऑफिस प्रभात प्रिंटींग प्रेसच्या वर मुकुंदनगर पुणे येथील कपाटात २ लाख रु. रोख रक्कम ठेवलेली असताना, त्यांचे ऑफिसमधील ऑफिसबॉय नामे अतुल पांडुरंगजी बुरुडकर,याने फिर्यादी यांचे परवानगी शिवाय लबाडीचे इराद्याने चोरी करुन पळुन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. राठोड ९८८१२०१५२० |

## दि.११/०६/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे २५९/१९,भादविक ३५३,३३२,५०४,५०६(१),३४ |
| **फिर्यादी** | सी.जे. शिरगीरे, पो.शि.लष्कर पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपी** | १)इकबाल शेख,रा.चुडामन तालीम,भवानी पेठ,पुणे २) आझम इकबाल शेख,रा.सदर -- (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०६/२०१९ रोजी २०/४० वा.चे सुमारास अश्रफी जनरल स्टोअर्स समोर शिवाजी मार्केट जवळ, कॅम्प,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे कर्तव्यावर हजर असताना, अश्रफी |

| | |
|---|---|
| | जनरल स्टोअर्स समोर शिवाजी मार्केट जवळ, कॅम्प,पुणे या दुकानाचा मालक इजहर शेख व यातील अ.क्र.१ यांची भांडणे सोडवत असताना, अ.क्र.१ इकबाल शेख, याने फिर्यादी यांना लोखंडी पाईपने उजव्या हातावर मारहाण केली व अ.क्र.२ याने शिवीगाळ करुन, धमकी देवुन, फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. तसेच नमुद इसमाने स्वतःचे डोके चारबावडी पोलीस चौकीच्या भिंतीवर आपटून घेवुन जखमी करुन घेतले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जी.बी.कुलाळ ९०११०५२६४० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**